Vol 6 Issue 12 January 2017
ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## International Advisory Board

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY - 2017

# पश्चिम विदर्भातील मातंग जात

*डॉ संतोष एम. खंडारे*
*समाजशास्त्र विभाग प्रमुख ,*
*श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय,*
*कारंजा लाड जि. वाशिम.*



*सारांश :*

भारतीय समाजात जात एक वास्तव आहे. प्रत्येक जातीसमुहाची जीवन पध्दती , संस्कृती वेगवेगळी आहे, प्रत्येक जातीसमुह आपल्या जाती समुहाची सस्कृती जतन करीत असतो. भारतात जातीव्यवस्था स्थिरावण्यापूर्वी शेकडो जमातीचे वास्तव्य होते. त्या श्रेष्ठ–कनिष्ठ स्तरात वावरत होत्या. त्यांच्यातील उपजातीचे स्वरूप व दैवते भिन्न होती. जातीप्रथेला विरोध करणारा पहिला कायदा इ.स. १८५० मध्ये ब्रिटीशांनी पास केला. १९२३ मध्ये परिपत्रककाढुन अस्पृश्यानां शाळेत प्रवेश देणे आवश्यक मानले. आधुनिक काळात जातीमंडळाव्दारा झालेली जागृती, शिक्षणाचा प्रसार, घटनेने प्रदान केलेले समतेचे अधिकार व तरतुदी, कायदे यासर्व वर्तमान परिस्थितीत महाराष्ट्रातील मातंग समाजातील उपजाती आज उध्दाराच्या, योग्य मार्गदर्शनाच्या शोधात आहेत. मांग पूर्वी आदिवासी असलेल्या व मध्यंतरी भटक्याचे जीवन जगणा–या आणि आता गावाशेजारी मांगवाडयात स्थायिक झालेल्या जातीचा अंतर्भाव १९६१ च्या अनुसूचित जातीमध्ये करण्यात आला.१ 'गाव तेथे मांगवाडा' असे म्हणत असतांना महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भातील मातंग जातीउपजातीच्या संदर्भात ग्रामिण भागातील गावात मातंग कुटुंबाची संख्या कमी आहे. काही गावांमध्ये मातंग कुटुंब वास्तव्यास नाहीत. इतर महाराष्ट्राच्या तुलनेत पश्चिम विदर्भातील मातंग जातीसमुहामध्ये फुले, शाहू, डॉ. आंबेडकर व अण्णा यांच्या विचारातून प्रेरणा घेवून एक सांस्कृतिक चळवळ उभी झाली नाही पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडयामध्ये मातंग जातीत सामाजिक जागृति शैक्षणिक परिवर्तनाची गती अधिक दिसून येते. पश्चिम विदर्भातील मातंग समुहामध्ये रूढी, परंपरा सोडून तोडून स्वाभिमानाने जगण्याचा निर्धार अलिकडे होत आहे.

समाजउध्दाराची चळवळ ओढयासारखी नसून वाहत्या झ–यासारखी असावी. जोपर्यंत ध्येय साध्ये होत नाही तोपर्यंत प्रयत्नशील असावयास पाहिजे. आजची पश्चिम विदर्भातील मातंग समाजाची परिस्थिती हालाकीची आहे. धार्मिकवृती, परंपरागत व्यवसाय यामुळे इतर महाराष्ट्रातील मातंग जातीउपजाती समुहापेक्षा पश्चिम विदर्भातील मातंग समुहात परिवर्तनाची गती मंद का? आहे याविषयीचा आढावा प्रस्तुत निबंधामध्ये घेण्याचा प्रयत्न केला आहे.

*उदिष्ये :–*

१ पश्चिम विदर्भातील मातंग जातीउपजाती समुहातील परिवर्तनाची गती अभ्यासणे.
२ महाराष्ट्रातील मातंग जातीतील उपजातीचा आढावा घेणे.

*ऐतिहासिक पार्श्वभूमी :–*

थर्स्टन आणि रंगाचारी यांनी मांग तथा मादिगासंबंधीची प्राचीनता आणि मूळ स्थान या बाबतीत आपले मत व्यक्त केले आहे की– मातंग प्राचीन काळात दक्षिणेत राज्यकर्ते होते. मातंग हे राजवंशीय म्हणजे राज्यकर्ते होते. मातंग आपला पूर्वज मातंग ऋषी , जाबंव ऋषी यांना मानतात.

मांग हे अतिप्राचीन काळापासून जंगलात राहत होती असेही सांगण्यात येते. रामायण, महाभारत लोककथा शिलालेख बदामी येथील माकुटेश्वराच्या देवळाजवळ पडलेल्या स्तंभ यावरून मातंग समाजाची प्राचीनता लक्षात येते.

मांगाचे स्वतंत्र्य नि सार्वभौम राज्य खालसा म्हणजे संपुष्टात आले ते सहाव्या शतकाच्या उत्तरार्धात त्या वेळेस मातंग जात असाहय झाल्याने भटकंतीचे जीवन जगु लागली आणि कालांतराने जंगल सोडुन खेडयाकडे आपल्या उदरनिर्वाहाकरीता आकर्षित झाली. या संक्रमनकाळात मातंग जातीचा हिन्दु जातीव्यवस्थेशी संबंध आला. तो काळ धर्मयुगाची सुरूवात होता. या कालखंडात जातीव्यवस्था कमालीची ताठर होती. एक वन्य जमात नि नंतरच्या काळात भटकी जमात म्हणुन मातंग जात ग्रामीण समुदायाचा एक घटक बनली. आणि जातीव्यवस्थेच्या नि अस्पृश्यतेच्या पिंज-यात अडकली. अर्थातच मातंग म्हणजे अंत्येवासी, गावाच्या शेवटी राहणारे शुद्रातील खालचे लोक (कर्वे १९६७ :९०) , मांग जात अस्पृश्य असून गावाबाहेर राहणारी आहे. (कोलते सं १९४६ः ४७) यादवकालीन महाराष्ट्रात (इ. स. १००० ते १३३०) मांग जातीची घरे गावकुशाबाहेर असत इतर जाती जमातीचे घरे गावकुशा आत असत असे वर्णन (क.ग. पानसे १९६३-६४ :११२) मिळते.

ज्याकाळी मातंग जाती ग्रामीण समाव्यवस्थेत स्थिरावल्या त्याकाळी कमालीची जातीभेद नि अस्पृश्यता होती हे मान्य केल्यास नंतरच्या काळात समाविष्ट होणा-या जमातीला गावकुशाच्या आत प्रवेश मिळणे शक्य नव्हते. ज्यांच्याकडे स्वतंत्र्य असे अस्थित्वच शिल्लक नव्हते, स्वतःची वेगळी अशी ओळख नव्हती, कारण वन्य जीवन जगण्याला सुमारे तीन साडेतीन शे वर्ष लोटली होती. भटकी जमात गावाचा शोध घेत गावाच्या कडेला स्थिरावली ग्रामव्यवस्थेच्या श्रेष्ट- कनिष्ठ वैशिष्टयांचा भाग बनली. रानीवनी भटके जीवन जगत असतांना उपजिविकेचे साधन म्हणुन त्यांच्यात काही गुणकौशल्ये विकसीत होत गेलीत. मातंग जातीला जी कलागुण अवगत होती ती पोटभरण्याचा आधार म्हणुन. ज्या व्यवस्थेत श्रेष्ठ- कनिष्ठेचा आधार घेवून व्यवहार वर्तन केले जात होते. तेथे मातंग जातीला निश्चितच कनिष्ठ स्तरातच प्रवेश मिळणे शक्य होते पण ऐवढयावर या व्यवस्थेचे समाधान होत नाही तर जिथे श्रेष्ठ- कनिष्ठेची भावना आहे तेथे प्रत्येक जातीसमुह हा इतर जातीसमुहापेक्षा आपले श्रेष्ठत्व सिध्द करण्याच्या प्रयत्नात असतो अर्थातच श्रेष्ठ जातीसमुहातही श्रेष्ठ असतो तर कनिष्ठ जातीसमुहातही कनिष्ठ मानण्याची प्रथा (भावना) असणे स्वाभाविक होती. नंतरच्या काळात ग्रामव्यवस्थेत समाविष्ट होणारी मातंग जात जाती व्यवस्थेतील शेवटची कडी गुंफल्या गेली असावी असे वाटते.

अनेक अभ्यासकाच्या अथवा विचारवंतांच्या मते आजच्या समाजस्थितीत ज्या कनिष्ठ , अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातीची नाव आहेत. पूर्वी यामधील मांग जातीचा उल्लेख आढळत नाही२ मातंग ही वन्य जमात होती बलुतेदारी व्यवस्थेत नंतरच्या काळात या जातीचा समावेश आहे असे मानले जाते.

### *उपजातीचे स्वरूप :-*

भारतीय समाजरचनेत अनेक जातीचा समावेश आहे.या जाती निरनिराळे व्यवसाय करतात. मातंग जातीकडे स्वतःचा अशा स्वतंत्र्य व्यवसाय नव्हता अठराविश्वे दारीद्रय असलेल्या समाजाची भटकंती ही उदरनिर्वाहाकरीता.

काही अभ्यासकांनी महाराष्ट्रातील मांग जातीत अनेक पोटजाती असल्याचे नमुद केले त्यामध्ये प्रामुख्याने इनथॅाम, केतकर, गोविंद मंगेश कालेलकर हे आहेत यांच्या मते- अस्सल/ मराठा मांग, ढाल्या मांग, बुरूड, चपकसंदे, डक्कर, देसूर, डक्करवार, जिनगर, जिराईत, ढोर, धाडसी, होलार, काकर, मानभाव, मांगगारूडी, मोची, नाडे, परीट, पेड, शिवते, तेलंगी, टोकरफोडे, झारे इ.

उपरोक्त जातीसमुहापैकी काही उपजाती आपले वेगळे अस्थित्व मानतात.

अनुसूचित जातीतील उपेक्षित व दुर्बल घटकात असलेल्या मातंग जाती समुहाला शासनांच्या योजनांचा लाभ देउन त्यांचा आर्थिक , शैक्षणिक विकास साधण्यासाठी ११ जुलै १९८५ रोजी लोकशाहिर अण्णा भाउ साठे विकास महामंडळ स्थापन करून मातंग जातीसमुहात अंतर्गत असणा-या १० पोटजाती मानल्या आहेत. तसेच अनुसूचित जाती व जमाती आदेश सुधारणा कायदा १९७६ मधील परिशिष्ट १ मधील भाग १० मध्ये नमुद केल्याप्रमाणे अनुसूचित जाती यादीतील क्र ४६,४७ प्रमाणे मांग, मातंग, मिनीमादिग, दखनी, मांग, मांगम्हशी, मदारी, राधेमांग, गारूडी, मांग गारोडी, मांग गारूडी. इ.

विभागीय स्तरावर- वऱ्हाडी मातंग, खानदेशी मातंग, दखनी मातंग, घाटोळे मातंग इ.

विभागीय स्तरावर पश्चिम विदर्भाचा विचार करतांना असे लक्षात येते की या विभागामध्ये वऱ्हाडी मातंग घाटोळे मातंग जाती समुहाचे वास्तव्य आहे थोडयाफार प्रमाणात दखनी मातंग समुहाचे कुटुंब आढळुन येतात. पश्चिम विदर्भ अर्थात अमरावती विभाग अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा या जिल्यात उपरोक्त उपजाती समुहापैकी वऱ्हाडी मातंग व घाटोळे मातंग समुहाला - घाटावरचे म्हणजे घाटोळे व घाटाखालचे म्हणजे वऱ्हाडी असे संबोधण्यात येत होते.

पश्चिम विदर्भातील मातंग जातीतील उपजातीसमुहापेक्षा इतर विभागामध्ये जसे कि मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र मातंग उपजातीची संख्या , त्यांचे वास्तव्य अधिक आहे. पश्चिम विदर्भामध्ये मातंग जातीला 'चिवंग' म्हणतात. तर इतर महाराष्ट्रात 'अंबुज' म्हणतात.

पश्चिम विदर्भामध्ये ज्या प्रामुख्याने दोन उपजाती दिसून येतात. ज्यामध्ये वऱ्हाडी मातंग, घाटोळे मातंग हया दोन होत. इतर महाराष्ट्रात ज्या उपजाती आहेत ज्यामध्ये शैक्षणिक, आर्थिक राजकीयदृष्या फरक दिसतो. त्यापैकी काही उपजाती समुहाचे उपजिविकेचे व्यवसाय-

वाजंत्री मांग - बॅन्डचे ताफे उभारून वाजंत्रीचे काम करतात.
डक्कलवार - मांगांचे मागते, मांगांनाच मागुन आपली उपजिविका करतात.
रंगीत मांग - कातडयाला रंग देतो.
तेलंगी - शिंदीच्या फोकापासून झाडू बनवितो, डाले तयार करतो.
बुरूड - बांबूपासून निरनिराळया वस्तु तयार करतो.
पेड - गावात खळे करून अजिनाचे गाणे गावून पोटभरतात.
मांग गारूडी - गारूडयाचा खेळ करण्याचे काम करतात. इ.

पश्चिम विदर्भामध्ये वरील उपजातीचे वास्तव्य दिसत नसले तरी ज्या उपजाती आहेत त्यांच्यात वरील कामाचे प्रचलन दिसून येते. आज मात्र वऱ्हाडी मातंग आणि घाटोळे मातंग यांच्यात सामाजिकदृष्टिने फरक दिसत नाही. काही व्यवसाय दोन्ही उपजातीमध्ये उपजिविकेचे साधन म्हणुन करतांना दिसतात. शिंदीच्या फोकापासून झाडू बनवितो, डाले तयार करतो. बांबूपासून निरनिराळया वस्तु तयार करतो, वाजंत्री वाजविणे, सार्वजनिक सण उत्सवामध्ये डफ वाजविणे यावरून त्यांची स्वतंत्र्य व्यवसाय, स्वतंत्र्य उपजाती नाहीत. परंपरेने चालत आलेले,

उदरनिर्वाहाचे साधन म्हणुन त्या व्यवसायाकडे बघितले जाते.

*दैवत :—*

महाराष्ट्रात मातंग जाती उपजातीमध्ये प्रामुख्याने पुढील देवदेवतांची आराधना केली जाते. मातंगी (लज्जागोरी रेणुका लक्ष्मी) मरीआई, लखाआई, जेठा, ध्रुपदा, इनामाय, सटवाई, (ताईबाई मराजूबाई मसाई) खंडोबा, मांगीरबाबा इ. पश्चिम विदर्भात मातंग उपजातीमध्ये प्रामुख्याने मरीआई, इनामाय, ध्रुपदा, सटवाई व खंडोबा इ. ला आपले दैवत मानण्याची प्रथा आहे. यातील मरीआईचे ठाणे (मंदिर) गावोगावी ज्या गावात चार–पाच मातंग कुटुंब आहेत त्या गावी दिसते. इनामायचे ठाणे विशिष्ट गावीच आहेत. इनामायचा उत्सव दस–याच्या आधल्या दिवशी सुरू होतो तर दुस–या दिवशी  म्हणजे दस–याच्या दिवशी त्याची सांगता होते. हा उत्सव, प्रथा आता कमी झालेली दिसून येते. विदर्भातील मातंग उपजाती मरीआईलाच लक्ष्मीचे रूप मानतात. तसेच रेणुकाचे सुध्दा उपासक आहेत. मरीआईला (अंबे, तुळजाभवानी रेणुका लक्ष्मी) कुलदेवता मानतात. पश्चिम विदर्भातील सौंदळा ता. तेल्हारा जि. अकोला येथे चैत्र महिन्यामध्ये अंबाआईची यात्रा भरते. त्या गावी मातंग जातीची पाच सहा कुटुंबे आहेत तेथे मरीआईचे ठाणे आहे. त्या ठाण्यावर गावातील यात्रेच्या दिवशी परिसरातील मातंग जातीतील लोकांची प्रचंड गर्दी असते. मरीआईचा भगत करण्याची प्रथा आहे. त्या यात्रेमध्ये गाडे– नाडे ओढण्याची प्रथा आहे. त्या गाडयामध्ये लहानमोठया भगत केलेल्या व्यक्तींचा समावेश असतो. संपूर्ण गाव व मंदीर परीसर प्रचंड डफांच्या आवाजात रममान झालेला दिसतो. चौहीकडे आनंदीआनंद असतो. श्रदधाभावाने लोक दुरदुरून गर्दी करतात. प्रत्येक धर्मानुसार धार्मिक क्रियांचे स्वरूप भिन्न भिन्न असते. धर्माचे अस्थित्व मान्य केले की धर्मातील पूजाअर्चा, होमहवन, कर्मकांड, आध्यात्मिकता इ. समावेश त्यामध्ये होतो. मातंग समाज हा हिन्दूधर्मीय समाज असल्यामुळे हिन्दूधर्मातील बहुतेक सण उत्सव या जातीसमुहात साजरे होतांना जाणवते.

*आशावाद :—*

पश्चिम विदर्भातील मातंग जातीतील उपजातीचे स्वरूप, त्यांचे दैवते याविषयीचे विवेचन केले असले तरी आजच्या आधुनिक युगात मातंग जाती उपजातीत परीवर्तन होत असलेले निदर्शनास येत आहे. मातंग समाजातील दारिद्रय कुणाचेही लक्ष चटकन  वेधून घेणारे आहे. समतावादी, नैतिकतावादी विचारच समाजाला बळ देवू शकतो असा विश्वास पुढे येत आहे. व्यक्तीचा , जातीचा विकास होण्यासाठी संधी आवश्यक असते.ही संधी आपोआप मिळत नाही त्याकरीता परीश्रम, जिध्द, चिकाटी हवी असते. मनुष्य जन्माने मोठा होत नसून कर्तृत्वाने मोठा होते यावर विश्वास ठेवावा लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे 'शिक्षण हे वाघिणीचे दुध' आहे. आपण शिकलेच पाहिजे, आपल्या मुलाबाळांनी शिक्षण घेतलेच पाहिजे असा अट्टाहास धरला पाहिजे. दारीद्रय व मागासलेपण माझ्या जातीसमुहापेक्षा इतर जातीसमुहामध्ये अधिक आहे. ही जाणिव निर्माण झाली तर खरोखर या अठराविश्वे दारिद्रयातून मुक्तीचा मार्ग मिळाल्याशिवाय राहणार नाही अशी वैचारीक क्रांतीची बीजे मातंग जात समुहात रूजविणे महत्वाचे आहे. मातंग समुहातील सुशिक्षित वर्गाची जबाबदारी वाढलेली आहे. ही जाणीव निर्माण होतांना दिसते. अशा सकारात्मकदृष्टिकोन घेवून मातंग जातीउपजातीचे समुह जीवन जगतांना दिसतात.

*निष्कर्ष :—*

१ महाराष्टात मातंग जातीसमुहात अनेक उपजाती आहेत. त्यांनी परिस्थितीनुरूप वेगवेगळे व्यवसाय अंगीकारले आहेत.
२ त्या पारंपारिकदृष्टिने , दैवते आणि सामाजिक दज्र्ाइ बाबतीत समान पातळीवर आहेत.
३ मातंग जातीजीन सर्वच उपजाती कनिष्ठ समजल्या गेल्यात.
४ पश्चिम विदर्भात इतर महाराष्टाच्या तुलनेत मातंग उपजातीचे प्रमाण कमी आहे.
५ मरीआइ्रव इनामाच वगळता इतर हिन्दुधर्मातील देवदेवतांचे उपासक असल्याचे प्रमाण अधिक आहे.
६ व-हाडी मातंग घाटोळे मातंग यांचे स्वतंत्र्य व्यवसाय नाहीत. सामाजिकदृष्टया समान दर्जा आहे. श्रेष्ठ–कनिष्ठतेची भावना दिसत नाही.
७ पश्चिम विदर्भातील मातंग जातीउपजातीमध्ये दारीद्रयाचे प्रमाण अधिक असल्याचे जाणवते.
८ पश्चिम विदर्भातील मातंग समुहावर धर्माचा अधिक प्रभाव दिसतो.
९ पश्चिम विदर्भातील मातंग समुहामध्ये सामाजिक सांस्कृतिक परिवर्तनाची गती मंद दिसते.

*संदर्भसूची :—*

१ सोमवंशी बी. सी.   – महाराष्टातील मांग – आनंद प्रकाशन, औरंगाबाद, २००६
२ शिंदे महर्षि वि. रा. – भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न – कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, १९३३
३ खडसे भा. कि.   – मांग जात – श्री मंगेश प्रकाशन नागपूर १९९०
४ मांडे प्रभाकर   – मांग आणि त्याचे मांगते – गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, १९९९
५ जाधव अश्रू   – मातंग समात विकासाच्या दिशेने – नचिकेत प्रकाशन, नागपूर २०११

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org